# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

15/7/24 1:10

दिनांक : १५/०७/२०२४

# प्रेसनोट

उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रात वैद्यकिय आरोग्य विभागा मार्फत नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र ५ अंतर्गत राज्यशासनाच्या प्राप्त मार्गदर्शक सूचनेनुसार १५ वा वित्त आयोग अंतर्गत **"आयुष्मान आरोग्य मंदिर-नागरी आरोग्य वर्धिनी केंद्र"** संभाजी चौक, उल्हासनगर-४ तसेच दुर्गापाडा, उल्हासनगर-५ येथे **नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र-१०** आज पासून सुरू करण्यात येत आहे. यांचा उद्घाटन सोहळा आज दिनांक १२/०७/२०२४ रोजी उल्हासनगर महापालिकेचे मा. प्रशासक तथा आयुक्त डॉ. अझीझ शेख यांच्या शुभहस्ते पार पाडण्यात आले. सदर सोहळ्यास मा. उपायुक्त- वैद्यकीय आरोग्य विभाग-डॉ. सुभाष जाधव, मा. वैद्यकीय आरोग्य अधिकारी-डॉ. मोहिनी धर्मा, जनसंपर्क अधिकरी-सौ. छाया डांगळे, शहर कार्यक्रम व्यवस्थापक-डॉ. विद्या चव्हाण, शहर लेखा व्यवस्थापक-श्री. दिनेश सरोदे, तसेच सर्व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रात सुरू करण्यात आलेल्या **"आयुष्मान आरोग्य मंदिर-नागरी आरोग्य वर्धिनी केंद्र"** तसेच **नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र-१०** मार्फत शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरिकांस मोफत आरोग्य सेवा पूरविण्यात येणार आहेत. या आरोग्य केंद्रामार्फत मोफत वैद्यकीय तपासणी, मोफत औषधोपचार उपलब्ध असून, आवश्यकतेनुसार तज्ञ व संदर्भसेवा देण्यात येतील असे मा.प्रशासक तथा आयुक्त साहेब यांनी सांगितले. तसेच महाराष्ट्र शासनाच्या या महत्वकांक्षी योजनेचा सर्व उल्हासनगर महानगरपालिकेच्या नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन केले. वैद्यकीय आरोग्य विभागास उर्वरित **"हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना"** व **"आयुष्मान आरोग्य मंदिर-नागरी आरोग्य वर्धिनी केंद्र"** लवकरात-लवकर सुरु करणेबाबत निर्देश दिले.

15/7/24

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – माहितीस्तव.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
- सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.